पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण
स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा., जिल्हा-नाशिक
फोन नं. 0253 / 2309710
ई मेल - pilcbnskr@gmail.com

**प्रेस नोट** दि.०५/०४/२०२४

## वावी पोलीस स्टेशन हददीतील कहांडळवाडी ता.सिन्नर येथे खुन करून पसार झालेल्या ०२ आरोपींना स्थानिक गुन्हेशाखे कडुन कसारा जि ठाणे येथुन अटक.

वावी पोलीस ठाणे हददीत दि.०३/०४/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा कहांडळवाडी शिवार,ता सिन्नर येथे रोडकडेला असलेल्या शेतात कुजलेल्या अवस्थेत असलेल्या पुरूषाचा मृतदेह मिळुण आलेला होता.सदर मृददेहाचे बाजुला रक्ताने माखलेला दगड मिळुण आलेला होता.सदरचे अज्ञात मयताची ओळख पटविली असता तो दिलीप भाउसाहेब सोनवणे रा. चिंचोली गुरव ता संगमनेर जि.अहमदनगर असल्याची माहीती मिळुण आलेली होती. यातील मयताचे डोकयावर,मानेवर वार करून त्यास ठार मारलेले होते त्याप्रमाणे वावी पोलीस ठाणे येथे I गु र नं १४८/२०२४ भादविक ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान मयत दिलीप सोनवणे याचेसोबत राहणारा त्याचा मावसभाउ कृष्णा उर्फ पोपट जालींदर जाधव रा.चिंचोली गुरव ता संगमनेर व मित्र अजय सुभाष शिरसाठ रा.चास ता सिन्नर यांनी दिलीप सोनवणे याचा खुन केल्याची माहीती प्राप्त झालेली होती. गुन्हा घडल्यापासुन कृष्णा जाधव व अजय शिरसाठ हे फरार होते व त्यांचे मोबाईल देखिल बंद येत होते. वावी पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांकडुन त्यांचा शोध सुरू होता.

आज दि.०५/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि/राजु सुर्वे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की कृष्णा जाधव व अजय शिरसाठ हे कसारा रेल्वे स्टेशन जि ठाणे परिसरात फिरत आहे. मिळालेल्या माहीतीप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक व ईगतपुरी पोलीस ठाणेकडील पथक यांनी कसारा रेल्वेस्टेशन परिसरात सापळा रचुन कृष्णा जाधव व अजय शिरसाठ यांना शिताफिने ताब्यात घेतले आहे.

ताब्यात घेतलेले आरोपी **कृष्णा उर्फ पोपट जालींदर जाधव,वय-२२ वर्षे रा.चिंचोली गुरव ता संगमनेर** व **अजय सुभाष शिरसाठ ,वय-२३ वर्षे रा.चास ता सिन्नर** यांचेकडेस खुनाचे गुन्हया बददल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हयाची कबुली दिलेली आहे. सदरचा गुन्हा अनैतिक संबधाच्या संशयातुन झाल्याचे निष्पन्न झाले आहे.सदर आरोपींना पुढील तपासकामी वावी पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामिण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, व उपविभागीय पोलीस अधिकारी, निफाड विभाग निफाड श्री.निलेश पालवे , यांचे मार्गदर्शन व सुचंनाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री.राजु सुर्वे,सपोनि/गणेश शिंदे,पोलीस अंमलदार/नवनाथ सानप,विनोद टिळे,विश्वनाथ काकड,हेमंत गिलबिले,,प्रदीप बहीरम,चालक/विकी म्हसदे व ईगतपुरी पोस्टे कडील ASI गणेश परदेशी, पोशि/अभिजीत पोटींदे यांचे पथकाने वरिल आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.